RNI No. MAHBIL/2009/37831

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार-ब

वर्ष ८, अंक १२८] सोमवार, ऑक्टोबर १०, २०२२/आश्विन १८, शके १९४४ [पृष्ठे ३, किंमत : रुपये ९.००

असाधारण क्रमांक ३७७

**प्राधिकृत प्रकाशन**

महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले
(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.

**वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग**

गोकुळदास तेजपाल रुग्णालय संकुल,९ वा मजला, नवीन मंत्रालय,
लोकमान्य टिळक मार्ग, मुंबई ४०० ००१, दिनांक १० ऑक्टोबर २०२२.

**अधिसूचना**

**महाराष्ट्र वैद्यकीय अधिनियम, १९६५.**

क्रमांक मवैप-०८२२/प्र.क्र.५०/अधिनियम.—ज्याअर्थी, महाराष्ट्र वैद्यकीय परिषद, १९६५ ( १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम ४६ ) ( यात यापुढे ज्याचा निदेश" उक्त अधिनियम" असा करण्यात आला आहे ) च्या कलम ३ ( १ ) अन्वये काढण्यात आलेल्या शासकीय अधिसूचना, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग क्रमांक एमएमसी-०३१६/प्र.क्र.०९/अधिनियम, दिनांक ०८ ऑगस्ट २०१७ ( यात यापुढे जीचा निर्देश "उक्त अधिसूचना" असा करण्यात आला आहे ) द्वारे महाराष्ट्र शासनाने, महाराष्ट्र मेडिकल कौन्सिल या परिषदेची स्थापना केलेली आहे.

आणि ज्याअर्थी, परिषदेच्या सदस्यांचा कालावधी दिनांक ०७ ऑगस्ट २०२२ रोजी संपुष्टात आला आहे;

आणि ज्याअर्थी, परिषदेवर नवीन सदस्य निवडण्यासाठी निवडणुका घ्यावयाच्या आहेत आणि म्हणून परिषदेचा पाच वर्षांचा कालावधी संपुष्टात आल्यानंतर उक्त परिषद पुढे चालू ठेवावी हे शासनाला इष्ट वाटत नाही व नवीन परिषदेची रचना होईपर्यंत शासनास उक्त परिषदेवर प्रशासकाची नियुक्ती करावी असे वाटते ;

आणि ज्याअर्थी, उक्त परिषदेचे कामकाज अंतरिम कालावधीसाठी सुरळीत चालावे यासाठी शासनाने डॉ. पल्लवी सापळे, अधिष्ठाता, सर ज.जी. शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, मुंबई यांची उक्त परिषदेचे सर्व अधिकार व कर्तव्य पार पाडण्यासाठी प्रशासक म्हणून नियुक्त करण्याचे ठरविले आहे.

त्याअर्थी, आता महाराष्ट्र वैद्यकीय परिषद, १९६५ च्या कलम ३१ याद्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करून महाराष्ट्र शासन डॉ. पल्लवी सापळे, अधिष्ठाता, ग्रॅण्ट शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व सर ज.जी. रुग्णालय समुह, मुंबई यांची उक्त परिषदेचे सर्व अधिकार व कर्तव्य पार पाडण्यासाठी एक वर्षांच्या कालावधीसाठी किंवा परिषद नव्याने यथोचितरित्या गठित होईपर्यंत, यापैकी जे अगोदर घडेल तोपर्यंत प्रशासक म्हणून नियुक्ती करीत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**सुरेन्द्र चानकर,**
शासनाचे उप सचिव.

## MEDICAL EDUCATION AND DRUGS DEPARTMENT

G. T. Hospital Complex, 9th Floor, New Mantralaya, Lokmanya Tilak Road,
Mumbai 400 001, dated the 10th October 2022.

*NOTIFICATION*

THE MAHARASHTRA MEDICAL COUNCIL ACT, 1965.

No.MMC-0822/C.R. 50/Act.—Whereas by Government Notification, Medical Education and Drugs Department No.MMC-0316/CR-09/Act, dated 08th August 2017 the Maharashtra Medical Council (hereinafter referred to as "the said Council") has been constituted under sub-section (*1*) of Section 3 of the Maharashtra Medical Council Act, 1965 (No.XLVI of 1965) (hereinafter referred to as "the said Act").

And whereas, the term of the office of the Members of the said Council has been expired on 07th August, 2022 ;

And whereas, elections are to be held to elect new members of the Council and therefore the Government does not think it desirable to continue the said Council after the expiry of the five years period of the Council and the Government feels that an Administrator should be appointed on the said Council until the new Council is constituted ;

And whereas, the Government of Maharashtra has decided to appoint Dr. Pallavi Saple, Dean, Grant Government Medical College and Sir J.J. Group of Hospital, Mumbai to be the person as Administrator, to exercise all the powers and perform all the duties of the said Council during the interim period for the smooth working.

Now, therefore, in exercise of the powers conferred by Section 31 of the Maharashtra Medical Council Act, 1965 and all other powers enabling it in that behalf, the Government of Maharashtra hereby appoints Dr. Pallavi Saple, Dean, Grant Government Medical College and Sir J.J. Group of Hospital, Mumbai to be person as Administrator to exercise all the powers and perform all the duties of the said Council for a period of one year or till the new Council is duly constituted, whichever is earlier.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

SURENDRA CHANKAR,
Deputy Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.